www.sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १५७ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.९ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## जागावाटपाचा वाद दिल्लीदरबारी:भाजपचा शिवसेनेवर दबाव

# उत्तर पश्चिम मुंबई,नाशिक,यवतमाळ, हिंगोलीची जागा शिंदेंकडून हवी

**मुंबई**–सत्ताधारी पक्ष महायुतीतीलजागावाटपाचा वाद लवकरच संपुष्टात येण्याची शक्यता आहे. शुक्रवारीदिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह,भाजप अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीला उपस्थित राहण्यासाठीमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितपवार यांना खास दिल्लीत बोलावण्यात आले होते.

भाजपच्या अंतर्गत सर्वेक्षणात शिंदेगटाचे अनेक संभाव्य उमेदवारनिवडणूक जिंकण्याच्या स्थितीतनसल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे.यामुळेच उत्तर पश्चिम मुंबई, नाशिक,यवतमाळ, हिंगोली हे लोकसभामतदारसंघ सोडण्यासाठी भाजपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटावरमोठा दबाव आणत आहे. मात्र,मुख्यमंत्री शिंदे हे सध्या कोणत्याहीराजकीय दबावापुढे झुकायला तयार नाहीत.त्यामुळे त्यांना भाजपने त्यांच्या संभाव्यउमेदवारांची नावे बदलण्याचा सल्लाहीदिल्याचे सांगण्यात येत आहे. विशेष म्हणजे, यवतमाळ–वाशिम लोकसभामतदारसंघातून खासदार भावना गवळीयांच्या विरोधात स्थानिक परिसरातवातावरण असल्याने त्यांच्या जागी मंत्रीसंजय राठोड यांना तिकीट मिळण्याचीशक्यता असल्याचे सांगण्यात येत आहे.आघाडीच्या तिन्ही पक्षांमध्ये एकूण १५जागांवर वाद असल्याचा उल्लेख प्रकाशआंबेडकर वारंवार करत आहेत.दुसरीकडे कॉंग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादीअसा कोणताही वाद नसल्याचे सांगतअसून वंचितने अद्याप किती आणिकोणत्या जागा हव्यात याचा प्रस्ताव दिलानसल्याने जागावाटप रखडल्याचेसांगितले जात आहे. त्यामुळे प्रकाशआंबेडकर सबुरी पाळून मविआतीलपक्षांमधील वाद असलेल्या १५ जागांवरडोळा ठेवून बसले असल्याचे दिसून येतआहे.महाविकास आघाडीच्या जागावाटपाच्या चर्चेच्या फेऱ्या सुरूच आहेत. ६ मार्च रोजी



झालेल्याबैठकीनंतर ९ मार्च रोजी होणाऱ्याबैठकीत जागावाटपासंदर्भात अंतिमनिर्णय निघेल, असे मविआ नेत्यांकडून सांगण्यात आले होते. मात्र, कॉंग्रेस – शिवसेना तर शिवसेना – राष्ट्रवादीतकाही जागांवर अद्याप पेच कायम आहे. त्यातच वंचितने अद्याप कोणत्या जागा हव्यात हे सांगितले नसल्याने महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा तिढावाढतच असल्याचे दिसून येत आहे. शुक्रवारी होणाऱ्या बैठकीत वंचितआपला प्रस्ताव सादर करणारअसल्याची चर्चा असल्याने मविआचे जागावाटप पुढे सरकण्याची शक्यतावर्तवण्यात येत आहे. मविआच्याजागावाटपाचा तिढा सुटत नसल्यानेकॉंग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथलासुद्धाआजच्या बैठकीत उपस्थित राहण्याचीशक्यता आहे. चेन्नीथला यांचा याबैठकीत तोडगा काढण्याचा प्रयत्नराहणार असून १७ मार्च रोजी राहुल गांधीयांच्या सभेच्या निमित्ताने सोनिया गांधी,मल्लिकार्जुन खरगे मुंबईत येणार आहेत.त्यानिमित्ताने राज्यातील मविआचाजागावाटपाचा तिढा मुंबईतचसोडवण्याचा प्रयत्न चेन्नीथला यांचाराहणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.अजितदादांना बारामतीसह केवळ २ ते ३ जागा मिळण्याची शक्यता आहे. मात्र,असे असतानाही संपूर्ण पवार कुटुंबीयत्यांच्याविरोधात असल्याने राजकीयकोंडीमुळे त्यांना या वेळी भाजपची मागणीमान्य करणे भाग असल्याचे दिसत आहे.मात्र, लोकसभा निवडणुकीत जास्त जागाघेण्याऐवजी अजित पवार विधानसभानिवडणुकीत जास्त जागा देण्याची मागणीकरत आहेत.

## पंचधारा शिवमंदिरात भाविकांची दर्शनाकरिता प्रचंड गर्दी

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील पंचधारा शिव मंदिरात महाशिवरात्री निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. भक्तांनी शुक्रवारी सकाळपासूनच दर्शनासाठी रांग लावली होती.

महाशिवरात्री निमित्ताने येथील पंचधारा शिव मंदिरात विविध कार्यक्रम सुरू आहे. कलशधारी मातृशक्तीसह विविध देखाव्यासह मिरवणूक काढण्यात आली. एक लक्ष शिव पिंडीचे निर्माण व रोज शिवकथेचे निरूपण करण्यात आले. श्री पंचधारेश्वर शिवभक्त समिती व जय भोले बहुउद्देशीय संस्था पुलगाव यांच्याकडून महाशिवरात्री पर्वावर एक लक्ष शिव पिंडी निर्माण व पुजन करण्यात आले. प्रात:काळी पुरातन शिव मंदिरातील शिवपिंडीचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर भक्तांची दर्शनासाठी रांग लागलेली. येथे दर्शनाला येणाऱ्या प्रत्येक भक्ताला दर्शन घेता यावे, यासाठी पुरुष व महिला यांच्या वेगवेगळ्या



रांगा करण्यात आल्या. सर्वांना प्रसाद वितरण करण्यात आले.

मंदिराच्या मार्गावर विविध संघटना, संस्था, परिसरातील संघटना कडून निरज खत्री मित्र परिवार कडून साबुदाना खिचड़ी पापड़,विशाल मोकाती मित्र परिवार कडून चहा,बाबा बर्फानी मित्र परिवार कडून खिचडी, महाकाल सेवा संघटना कडून फराळ चिवडा,आर.एस.गुर्प कडून शरबत,टायगर गर्प कडून शरबत, प्रमोद पवार कडून चहा,राऊत परिवार कडून पाणी, आदी अनेक सामाजिक संघटना कडून फराळ चे पाणी चे स्टाल वितरणाचे स्टॉल लावले होते. पंचधारा परिसरात असलेल्या ५४ फुट उंचावर असलेल्या शिव मुर्तीचे विशेष पुजन नागद्वार भक्तांनी केले. पंचधारा शिव मंदिर समितीचे देवीसिंह ठाकूर, व सर्व सदस्य व्यवस्थेचे व्यवस्थापन करीत होते. पहाटेपासून झालेली गर्दी येथे वृत्त लिहेपर्यंत कायम होती.ल पोलिस प्रशासन कडून सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस बंदोबस्त लावण्यात आले.

## महिला दिनानिमित्त तळोधी पोलीस स्टेशन तर्फे महाविद्यालयिनन युवतींचा सन्मान

**तळोधी(बा) । प्रतिनिधी**

८ मार्च रोज शुक्रवारला जागतिक महिला दिन निमित्त यादवराव पोशिट्टीवार महाविद्यालयाच्या ५ युवतीं नामे प्रणाली दिघोरी ,प्राजक्ता गावतुरे , जया महाडोके, राणी दुमाने व पायल निखारे सर्व रा.तळोधी अशांना पोलीस ठाणे तळोधी येथे बोलावुन त्यांना पोलीसांबद्दल ,पोलीस दलात महिलांना असलेल्या संधीबाबत , पोलीस दलातील पदस्थ असलेल्या महिला अधिकाऱ्यांच्या योगदानाबाबत माहीती देवुन त्यांना पुष्पगुच्छ व भेटवस्तु देवुन त्यांचा सत्कार केला.

तसेच पोस्टेतील महिला अंमलदार पोशि संगिता कुसनवार , पोशि वैष्नवी लेनगुरे , पोशि रिया मोहुर्ले , महिला होमगार्ड करिष्मा जनबंधु व महिला होमगार्ड कांचन नागोसे , महिला सफाई कामगार मायाबाई सोयाम अंशाचा सत्कार करुन त्यांना भेटवस्तु त्यांच्या योगदानाबाबत धन्यवाद




व्यक्त केलेत.तसेच महिला अंमलदार संगिता कोसनवार यांना प्रतिनिधीक स्वरूपात ठाणेदार म्हणून संधी देवुन सन्मान करण्यात आला.

## कोटेश्वर येथे भक्तांची दर्शनासाठी प्रचंड गर्दी







**पुलगाव । प्रतिनिधी**

वर्धा नदीच्या किनाऱ्यावर असलेलं कोटेश्वर देवस्थान मध्ये यवतमाळ, वर्धा, नागपूर या तीन जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर भाविक महादेवाच्या दर्शनासाठी येत असतात.

या स्थानावर वशिष्ठ ऋषींनी एक कोटी यज्ञ केले. त्यामुळे या स्थानाला कोटेश्वर नाव पडले. या स्थानी अजूनही यज्ञाची विभूती सापडते. कोटेश्वर येथे असलेल्या वर्धा नदीच्या पात्रामध्ये बेलाचे पान टाकले असता ते तरंगत नाही, तर नदीपात्रामध्ये बुडते. हा जिवंत चमत्कारच आहे. त्याचप्रमाणे कोटेश्वर देवस्थानच्या कळसावर असलेली कडुलिंबाची फांदी याची पाने कडू न लागता गोड लागतात. शिवरात्रीच्या पर्वावर मोठ्या प्रमाणावर भाविक भक्त महादेवाचे दर्शन घ्यायला येत असतात. वर्षभर नियमित भक्तांची रीत लागलेली असते. महाशिवरात्रीनिमित्त कोटेश्वर देवस्थान ट्रस्टने विविध कार्यक्रम आयोजित केले असून दहीहंडीने या कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचा उत्कृष्ट शिक्षिका सन्मान

**पुलगाव । प्रतिनिधी**

वर्धा जिल्हा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने महिला कर्मचारी शिक्षिका हिमोग्लोबिन तपासणी व क्रांतीज्योती सावित्री बाई फुले उत्कृष्ट शिक्षिका सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे.जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य प्राथमिका शिक्षक समिती वर्धा जिल्हा परिवाराकडून जिल्हा परिषदेच्या महिला कर्मचारी व शिक्षिकासाठी हिमोग्लोबिन तपासणी व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले उत्कृष्ठ शिक्षिका सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.महाराष्ट्र राज्य शिक्षक समितीचे राज्य अध्यक्ष विजय कोंबे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानदा फणसे, प्रमुख अतिथी जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी प्राथमिक डॉ.नीतू गावंडे, स्त्री रोग तज्ञ डॉ. स्मिता सचिन पावडे,जिल्हा परिषद शिक्षक बँक उपाध्यक्ष रामदास खेकारे, महाराष्ट्र राज्य शिक्षक समिती जिल्हा उपाध्यक्ष सुनीता डगवार, माजी उपाध्यक्ष सीमा आत्राम, जिल्हा परिषद एम्प्लॉयीज सहकारी बँक संचालिका सुवर्णा अहिरराव यांची उपस्थिती राहणार आहे. रविवार दिनांक १० मार्च सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेच्या सिंधुताई सिंधुताई सपकाळ सभागृहात शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी व वर्धा जिल्ह्यातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र शिक्षक परिषद शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष अजय बोबडे यांनी केले आहे.

## आनंद निकेतन महाविद्यालयात पाक कला व पुष्परचना स्पर्धेचे आयोजन



**आनंदवन । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या विशेष कलागुणांना वाव मिळण्यासाठी आनंद निकेतन महाविद्यालयात नेहमीच विविध स्पर्धांचे आयोजन होत असते.त्या अनुषंगाने दिनांक ७ मार्च रोजी पाककला व पुष्परचना स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पाक कलेत केवळ कणीक वापरून तयार केलेले गोड व खारे पदार्थ ठेवण्यात आले. त्यात विद्यार्थीनी विविध राज्यातील पाककृती करून सहभाग नोंदविला.

या स्पर्धेच्या आयोजना करिता लता आत्राम , किरण लांजेवार यांनी विशेष मेहनत घेतली. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. काळे यांचे हस्ते व उपप्राचार्य राधा सवाने यांच्या उपस्थितीत करण्यात आले. परीक्षक म्हणून गालकर,बरेकर, चिटणीस,जोशी यांनी सहकार्य केले.



नागभीड येथील शिवटेकडी रस्त्यावर महाशिवरात्री यात्रेनिमित्य विक्रीसाठी दुकानदाराने मांडलेल्या भगवान क्रिष्ण, शिवमहादेव,छत्रपती शिवाजी महाराज,तसेच इतर आकर्षक विलोभनीय मुर्त्या. छाया :प्रणय बांगरे.

## खेमजई येथे अतिप्रभावीत मेगा पाणलोट प्रकल्प अंतर्गत नंदादीप गाव योजना शिवार फेरी सपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

८ मार्च रोज शुक्रवारला महात्मा गांधी रोजगार हमी योजना,अक्सिस बँक फॉउंडेशन,भारत रुरल लाईव्हलिहूड फाऊंडेशन द्वारा कृषी विकास व ग्रामीण प्रशिक्षण संस्था मलकापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने ता.वरोरा येथील खेमजई, महालगाव, वायगाव भोयर ग्रामपंचायत या पंचायत समिती नंदादीप योजना साठी निवड झाली असून त्या अनुषंगाने, शिवार फेरी घेण्यात आली.

शिवार फेरी दरम्यान गावाचे शिवार पाहण्यात आले असून त्यानुसार कामाची पाहणी करून कामे घेण्यात आली.सिचन विहीर,तलाव गाळ काढणे,शेततळे, नालाखोलिकरण,मजगी, या सारखी जलसंधारण ची कामे घेऊन गावाचा जल सुरक्षा आराखडा तयार करण्यात आला व गावच्या पाण्याची पातळी घेऊन सर्व





गावकरी यांच्याशी चर्चा करण्यात आली असून त्या कामामुळे गावातील पाण्याची पातळी कायम करणे व महात्मा गांधी रोजगार हमी योजना सफल करणे,या योजनेतुन लोकांना प्रत्येक हाताला रोजगार मिळून देणे व सीमांत कुटुंब यांचे उत्पन्न डबल करणे,प्रत्येक शेतीला पाणी,प्रत्येक हाताला काम, सिंचन विहीर घेणे,या शिवार फेरीसाठी खेमजई ग्रामपंचायत सरपंच मनीषा चौधरी,उपसरपंच चंद्रहास मोरे,ग्रामसेवक मेघश्याम येचंलवार रोजगार सेवक रवींद्र रणदिवे,ग्रामपंचायत सदस्य रमेश चौधरी व गावकरी तसेच कृषी विकास चे टीम लीडर रोशन मानकर ,प्रबुद्ध डोये (कृषी तज्ञ),दीक्षांत राऊत (तालूका समन्वयक) श्रीपत पाटील (जलसंधारण तज्ञ ), मंगेश तुमसरे, विशाल आडे,गुरूदास चौधरी,अंकुश रामपुरे,आचल घोडमारे,पल्लवी नन्नावरे,नीलिमा वनकर, माया पोहीणकर सर्व उपस्थित होते.


# खरंच, विद्यार्थी गुणवत्ता वाढेल काहो?

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पाचवी आणि आठवीच्या वर्गांसाठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन यांची कार्यपद्धती निश्चित करत आहे. पाचवी आणि आठवी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यामुळे त्या टप्प्यापर्यंत त्यांना शिकवलेल्या गोष्टी व्यवस्थित समजल्या आहेत की नाही, याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तशी पूर्वीचीच सर्व वर्गात परीक्षा ही पद्धत योग्य होती. गुणवंत विद्यार्थी बरोबर गाळून पुढील उच्च शिक्षणासाठी पाठवली जात होती. पुन्हा जुने तेच सोने हे सत्य शासनाच्या प्रत्ययास येत आहे. श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर लेख शासनाची उपरती दर्शवित आहे.... संपादक.**

राज्यात नवे शैक्षणिक धोरण लागू करायचे असेल, तर गुणवत्तेच्या दृष्टीने पहिलीपासून आठवीपर्यंत नापास करायचे नाही, हे परवडणारे नाही, हे लक्षात आल्यावर शालेय शिक्षण विभाग यावर्षीपासून पाचवी आणि आठवीच्या वर्गांच्या वार्षिक परीक्षा घेणार आहे. पाचवी आणि आठवी या टप्प्यांवर प्रत्येक विद्यार्थ्याच्या गुणवत्तेची परीक्षा होणार आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या अनुदानित आणि विनाअनुदानित सर्व शाळांना हा नियम लागू असेल. शिक्षण विभाग बिनकामाचे नियम निर्गमित करून विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचे माथे भडकून घेते, त्यातून काही एक साध्य होत नाही. हा नेहमीचाच उपद्रव झाला आहे; ज्याला विभाग नवीन प्रयोग असे गोजिरवाणे संबोधन लावत असतो. बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना आठवीपर्यंत अनुत्तीर्ण करता येत नव्हते. मात्र, विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन करण्याची सक्ती या कायद्यात होती. त्याकडे दुर्लक्ष झाल्याने विद्यार्थी बहुतांश विषयात कच्चा राहू लागले. त्यांची गुणवत्ता थेट नववीच्या वार्षिक परीक्षेत मोजली जाऊ लागल्याने विद्यार्थी परीक्षेत अपयशी ठरत होते. आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करावे लागणार आहे. यात गुणवत्तेला अधिक प्राधान्य आहे. म्हणून शालेय शिक्षणात दोन टप्प्यांवर विद्यार्थ्यांची गुणवत्ता जोखण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यासाठी महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११मध्ये राज्य सरकारने सुधारणा केली आहे, असे दिसते. ते सूर्यप्रकाशात स्पष्टपणे पुढे दिसणारच आहे. सुधारित नियमांनुसार इयत्ता पाचवीच्या वर्गापर्यंत बालकाला वयानुरूप वर्गामध्ये प्रवेश देण्यात येईल. इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गात वयानुरूप प्रवेश देताना बालकास पाचवीच्या वर्गासाठीची विहित केलेली वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. बालक ही परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्या बालकाला पाचवीच्या वर्गात प्रवेश देण्यात येईल. यामुळे आता शाळेतील प्रवेशाच्या एक टप्प्यावर म्हणजे पाचवीला परीक्षा देत त्याची गुणवत्ता सिद्ध करावी लागणार आहे. त्यामुळे शिक्षक आणि पालक या दोघांचीही शैक्षणिक जबाबदारी वाढणार आहे. नेहमीप्रमाणे डोकेदुखी पाठ सोडणारच कशी? यासंबंधी अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी पुढील वर्गात जाण्यासाठी गुणवत्ता सिद्ध करता यावी म्हणून प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या शेवटी पाचवी आणि आठवीच्या वर्गासाठी वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. विद्यार्थी वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर अशा बालकाला संबंधित विषयासाठी शाळेला अतिरिक्त पूरक मार्गदर्शन द्यावे लागेल आणि वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत त्याची पुनर्परीक्षा घ्यावी लागेल. विद्यार्थी पुनर्परीक्षेत नापास झाले, तर त्यांना पाचवी किंवा आठवीच्या वर्गात, जसे असेल तसे ठेवले जाईल. मात्र, प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही बालकाला शाळेतून काढून टाकले जाणार नाही, असाही दिलासा दिला जात आहे. पहिलीपासून परीक्षाच नाही, असा समज झाला होता. परंतु प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांचे सर्वंकष मूल्यमापन झाले पाहिजे. त्यामुळे पाचवी आणि आठवीला वार्षिक परीक्षा सुरू होणार असेल, तर त्याचे स्वागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी गांभीर्य रुजेल आणि शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होण्यासही मदत होईल, असा शेवटी सकारात्मक विचार करणेच महत्वाचा ठरतो, हेच खरे!

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पाचवी आणि आठवीच्या वर्गांसाठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन यांची कार्यपद्धती निश्चित करत आहे. पाचवी आणि आठवी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यामुळे त्या टप्प्यापर्यंत त्यांना शिकवलेल्या गोष्टी व्यवस्थित समजल्या आहेत की नाही, याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पाचवी ते आठवीच्या परीक्षांत नापासही केले जाणार, अशी नुसतीच भिती दाखविली जात आहे, मात्र प्रत्यक्षात तो पहिल्याच प्रयत्नात



पास होईल, यासाठी शाळा प्रयत्नशील असेल, हे निश्चित! पाचवीला ५० गुणांची, तर आठवीला ६० गुणांची वार्षिक परीक्षा घेतली जाईल, असे म्हटले जाते. राज्याच्या रिकामटेकड्या शालेय शिक्षण विभागाने आठवीपर्यंत सर्वच विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्याच्या धोरणात बदल केला आहे. यंदापासून पाचवीच्या विद्यार्थ्यांची ५० गुणांची, तर आठवीच्या विद्यार्थ्यांची ६० गुणांची वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना आता पुन्हा त्याच वर्गात बसावे लागणार आहे. राज्य सरकारने या परीक्षांची आणि त्यांच्या मूल्यमापनाची कार्यपद्धती जाहीर केली आहे. राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने आठवीपर्यंत सर्वच विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्याच्या धोरणात बदल केला आहे. यंदापासून पाचवीच्या विद्यार्थ्यांची ५० गुणांची, तर आठवीच्या विद्यार्थ्यांची ६० गुणांची वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना आता पुन्हा त्याच वर्गात बसावे लागणार आहे. राज्य सरकारने या परीक्षांची आणि त्यांच्या मूल्यमापनाची कार्यपद्धती जाहीर केली आहे.

आगाऊ प्रयोगशील महाराष्ट्र राज्यात २०१०–११पासून पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती लागू करण्यात आली. त्यानुसार मूल्यमापनामध्ये 'ड' श्रेणी मिळालेल्या अथवा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण न करता त्यांनाही पुढील वर्गात प्रवेश दिला जात होता. मात्र त्यातून विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होत होते. तसेच विद्यार्थ्यांना वयानुरूप प्रवेश द्यायचा असल्याने त्यांना मागील वर्गातील अध्ययन कौशल्य अपेक्षित प्रमाणात मिळाली नसली तरी त्यांना पुढील वर्गात प्रवेश द्यावा लागत होता. त्यातून मुलांच्या पुढील अध्ययनात अडथळा येत असे. या पार्श्वभूमीवर आता इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी परीक्षा घेण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. पाचवीच्या विद्यार्थ्यांची १० गुणांची तोंडी आणि ४० गुणांची लेखी परीक्षा घेतली जाणार आहे. तर आठवीच्या विद्यार्थ्यांची १० गुणांची तोंडी आणि ५० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षा दुसऱ्या सत्राच्या अभ्यासक्रमावर आधारित असतील. परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना ३५ टक्के गुण मिळवावे लागतील. मात्र विद्यार्थी नापास झाल्यास त्यांना शाळेतील शिक्षकांकडून अतिरिक्त पूरक मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यानंतर या विद्यार्थ्यांची जून महिन्यामध्ये पुन्हा परीक्षा घेतली जाणार आहे. या पुनर्परीक्षेतही अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुन्हा त्याच वर्गात बसावे लागणार आहे. नव्या बदलामुळे विद्यार्थ्यांनी इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी किमान अपेक्षित अध्ययन कौशल्य प्राप्त केले की नाही, याची खात्री करता येईल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासाची सवय लावण्यासह पुढील शैक्षणिक आव्हाने आणि स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्यासाठी तयार करण्याचा उद्देश असल्याचे सरकारकडून नव्या निर्णयाचे समर्थन करताना सांगण्यात आले आहे, बघुया, किती प्रभाव दिसतो ते!राज्य सरकारने या परीक्षांचे सनियंत्रण आणि पर्यवेक्षण करण्यासाठी राज्य, जिल्हा, तालुका, केंद्र स्तरावर सनियंत्रण समित्या स्थापन करण्याचाही निर्णय घेतला आहे. या परीक्षा शाळास्तरावर घेतल्या जाणार आहेत. मात्र परीक्षांवेळी केंद्रस्तरीय भरारी पथके तयार करून शाळांना भेटी दिल्या जाणार आहेत. त्यानुसार या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडत असल्याची काळजी घेतली जाणार आहे. पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांना त्यांच्या वयानुसार थेट प्रवेश दिला जाणार आहे. मात्र सहावी ते आठवी इयत्तेच्या वर्गात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी त्यांना पाचवीची परीक्षा उत्तीर्ण करावी लागणार आहे. या परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा घेतली जाणार आहे. यावर प्रतिक्रिया व्यक्त करतांना म्हणावेसे वाटते, की एक ना धड; भाराभर चिंध्या!

!! सर्व विद्यार्थी मित्रांना गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षणासाठी हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली ९४२३७१४८८३.**

# ८ मार्च जागतिक महिला दिन म्हणून उत्साहात साजरा

## शहरातील महिलांसाठी सांगोला नगरपरिषदेने आयोजित केल्या विविध स्पर्धा

**सांगोला । प्रतिनिधी**



महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी, ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. याचाच एक भाग म्हणून सांगोला नगरपरिषदेच्या वतीने शहरातील महिलांसाठी विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पाककला स्पर्धा, होम मिनिस्टर यासारख्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक ५ मार्च रोजी पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शहरातील ४४ स्पर्धकांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी, तालुका कृषी अधिकारी श्री. शिवाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्षा सौ.राणीताई माने, श्रीम.शुभांगी पतंगे मॅडम यांनी कामकाज पाहिले. पाककला स्पर्धेत प्रथम क्रमांक श्रीम.शुभांगी तेली, द्वितीय क्रमांक श्रीम. सरिता लिगाडे, तृतीय क्रमांक श्रीम. वैजयंता दौंडे यांचा तर उत्तेजनार्थ म्हणून श्रीम. कार्तिकी मडके, श्रीम. माधवी खडतरे व श्रीम. अरुणा लोखंडे यांचा क्रमांक आला. दि. ६ मार्च रोजी होम मिनिस्टर व बक्षीस वितरण इ. कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी होम मिनिस्टर या मजेदार खेळाच्या माध्यमातून तीन स्पर्धकांना पैठणी भेट देण्यात आली. सदर स्पवर्धेमध्येस प्रथम क्रमांक श्रीम.मनिषा हुंडेकरी, द्वितीय क्रमांक श्रीम.अरुणा लोखंडे, तृतीय क्रमांक श्रीम.सविता लोखंडे यांचा आला. लकी ड्रॉच्या माध्यमातून उपस्थितांना विविध बक्षिसांचे वाटप करण्यात आले. विजेत्या व उत्तेजनार्थ स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व बक्षीसाच्या रक्कमेच्या धनादेशाचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लोकनियुक्त माजी नगराध्यक्षा सौ. राणीताई माने, मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी , तालुका कृषी अधिकारी श्री. शिवाजीराव शिंदे, निवडणूक नायब तहसिलदार श्रीम.शुभांगी जाधव, कृषी अधिकारी (पं.स.) दिपाली शेंडे, माजी उपनगराध्यक्षा सौ. स्वातीताई मगर, माजी नगरसेविका सौ.छायाताई मेटकरी, माजी नगरसेविका सौ.सुनिता खडतरे, माजी नगरसेविका सौ.अनुराधा खडतरे, अध्यक्ष कर्तव्य शहरस्तर संघ श्रीम.सुनंदा घोंगडे, कार्यालयीन अधीक्षक श्री. स्वप्निल हाके हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अनुपमा गुळमिरे यांनी केले. सदरचे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कर निरीक्षक श्री.रोहित गाडे, सहा.प्रकल्प अधिकारी योगेश गंगाधरे, प्रतिभा कोरे, समुदाय संघटक बिराप्पा हाके, शरद थोरात, सौ.जयश्री खडतरे,सौ सारिका लोखंडे, सविता लोखंडे व नगरपरिषद कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## आपुलकी प्रतिष्ठानची मागणी पूर्ण!

# धोकादायक विहिरीला बसवली संरक्षक जाळी



**सांगोला । प्रतिनिधी**

आपुलकी प्रतिष्ठानच्या मागणीनुसार सांगोला येथील कुंभार गल्लीतील धोकादायक असलेल्या सतीच्या विहिरीला संरक्षक जाळी बसवण्याचे काम नगरपालिकेने तातडीने पूर्ण केले आहे.

फेब्रुवारी महिन्यात कुंभार गल्लीतील धोकादायक सतीच्या विहिरीत एक लहान मुलगा खेळता खेळता पडला होता. परंतु, तेथीलच दोघांच्या सतर्कतेमुळे सुदैवाने त्याचे प्राण वाचले. त्यानंतर आपुलकी प्रतिष्ठान सांगोलाच्यावतीने यापुढे अशा घटना घडू नयेत म्हणून या विहिरीला संरक्षक जाळी बसवण्याची मागणी निवेदनाद्वारे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांच्याकडे ५ फेब्रुवारी रोजी केली होती. त्याचदिवशी मुख्याधिकारी गवळी यांनी आपल्या सहकाऱ्यांसह या धोकादायक विहीर परिसराला भेट देऊन पाहणी करून संरक्षक जाळी बसवण्यासाठी संबंधित विभागाला सूचना दिल्या होत्या. त्यानुसार एक महिन्याच्या आत संरक्षक जाळी बसवण्यात आल्याबद्दल या परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. तर आपुलकीच्या निवेदनाची तातडीने दखल घेऊन कार्यवाही केल्याबद्दल आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने मुख्याधिकारी डॉ. गवळी यांचे आभार मानण्यात आले.

# सोलापुरात भरदिवसा दरोडा, चेन स्नॅचिंग पंजाबचे तिघे चार तासांत अटकेत

**सोलापूर :** शहरातील वसंत विहार येथील महिलेच्या गळ्यातील चेन स्नॅचिंग करून बाळे येथील दुकानात एकटीच असलेल्या महिलेचे गंठण कोयत्याचा धाक दाखवून चोरणाऱ्या पाचपैकी तिघांना फौजदार चावडी पोलिसांनी काही तासांतच अटक केले. सिनेस्टाईलने बाळ्यातील माळरानावर दोन- अडीच तासांचा पाठलाग करून त्यांना पोलिसांनी पकडले.

मंगळवारी (ता. ५) नगरवरून दुचाकी चोरून पंजाबमधील पाचजण सोलापुरात आले होते. त्यातील तिघांकडे एक चारचाकी देखील होती. दुचाकीवरील दोघेजण डाव कोठे टाकता येईल याची माहिती घेऊन चोरी तथा चेन स्नॅचिंग करायचे. बुधवारी (ता. ६) दुपारी सव्वाबाराच्या सुमारास वसंत विहारमधील महिलेच्या गळ्यातील दागिने दुचाकीवरील (एमएच १६, डीजे ७७२४) दोघांनी ओढून नेले.त्यानंतर एका तासाच अंबिकानगर, बाळे येथील महिलेच्या गळ्यातील दागिने कोयत्याचा धाक दाखवून चोरले आणि चारचाकीतून (पीबी १०, जेके १९९३) तिघे व दुचाकीवरून दोघे पसार झाल्याची खबर फौजदार चावडी पोलिसांना मिळाली. महिलेने आरडाओरडा केल्याने ही बाब पोलिसांपर्यंत पोचली. बाळे परिसरात वाहतूक जाम असल्याने चोरट्यांनी बार्शी रोडने वेगाने वाहन पळवून माळरानावर गाडी नेली.पोलिसांनी त्यांचा पाठलाग केला आणि दुसरीकडे सोलापूर- पुणे महामार्ग, विजयपूर रोड, सावळेश्वर टोल, बार्शी रोड अशा ठिकाणी पोलिसांच्या टीम त्यांच्यावर वॉच ठेवून होत्या. दुचाकीवरील दोघेजण पळून जाण्यात यशस्वी झाले. पेट्रोल संपल्याने त्यांनी दुचाकी त्याठिकाणी टाकली होती.पोलिसांनी त्या चारचाकीचा पाठलाग करून केगाव बायपासवर विषकुमार राजेश कुमार (वय २४), राजकुमार राजगिर सिंह (वय २४) व हॅप्पी शेरा सिंग (वय २५) या तिन्ही संशयितांना पकडले. तिघेही पंजाबमधील लुधियानातील रहिवासी आहेत. वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिलीप शिंदे, पोलिस निरीक्षक विकास देशमुख, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक शंकर धायगुडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कामगिरी पार पाडली.

# मांजरी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या सरस्वती तुकाराम शिनगारे यांची बिनविरोध निवड

**सांगोला । प्रतिनिधी**

मांजरी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या सरस्वती तुकाराम शिनगारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. माजी उपसरपंच कौशल्याताई कांबळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी बुधवार दि. ६ रोजी पार पडलेल्या निवडणुकीत सरस्वती शिनगारे यांचा एकमेव अर्ज झाल्याने सदरची निवड ही बिनविरोध झाल्याचे निवडीचे अध्यक्ष तथा सरपंच मंगलताई मधुकर भुसे व ग्रामसेवक मंगेश पोरे यांनी जाहीर केले.

निवडीनंतर सरपंच मंगलताई भुसे , मा.उपसरपंच कौशल्याताई कांबळे व ग्रामपंचायत सदस्य यांनी नुतन उपसरपंच सरस्वती शिनगारे यांचा सत्कार केला व त्यांना उपसरपंच पदाचा पदभार दिला. या निवडीसाठी माजी सरपंच व विद्यमान



ग्रामपंचायत सदस्य अशोक शिनगारे, माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य शहनाज तांबोळी, रेणुका वरेकर ,नसीमा मुजावर, यांच्यासह माजी सरपंच सचिन शिनगारे ,डॉ.बाळकृष्ण जगताप, अनिल शिनगारे , अमित तांबोळी, राहुल शिनगारे ,उद्योगपती दीपक शिनगारे , शहाजी शिनगारे, विनायक कुलकर्णी , निसार मुजावर, दत्तात्रय भुसे, संभाजी कांबळे, पांडुरंग कांबळे ,रामदास शिनगारे, सोमनाथ शिनगारे , सचिन गंगथडे यांच्यासह आदी उपस्थित होते. उपसरपंच पदाच्या निवडीनंतर गुलालाची उधळण करीत फटाक्यांची आतषबाजी करून, आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी आपल्या सत्काराला उत्तर देताना मांजरी ग्रामपंचायतीच्या सर्वांगीण विकासासाठी मा. आम. दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली व सरपंच मंगलताई भुसे व सर्व सदस्य यांना विश्वासात घेऊन गावच्या विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहु असे अभिवचन नूतन उपसरपंच सरस्वती तुकाराम शिनगारे यांनी दिले.

मांजरी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या सौ. सरस्वती तुकाराम शिनगारे यांची बिनविरोध निवडणूक पार पडली. या निवडीसाठी सर्वच राजकीय पक्षाच्या पदाधिकारी व नेते मंडळींनी सहकार्याची भूमिका दाखवली. आणि एकोप्याने गावच्या विकासाला चालना देण्याचा प्रयत्न केला. त्याबद्दल सर्व राजकीय पक्षाचे व नेते मंडळी आणि पदाधिकारी यांचे मनःपूर्वक आभार.


**सौ. मंगल मधुकर भुसे**
**सरपंच, मांजरी ग्रामपंचायत मांजर**

# आमदार राहुल कुल यांचे संपुर्ण कुटूंब सुसंस्कृत : सुप्रिया सुळे

**दौंड । प्रतिनिधी**

दि.७ रोजी दौंड येथील हॉटेल प्राईम स्क्वेयर येथे पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.मागील २०१९ च्या लोकसभेला सौ कांचन राहुल कुल ह्या माझ्या विरोधात लोकसभेच्या निवडणुक लढल्या, परंतु त्यांनी माझ्या विरोधात कधीही टीका केली नाही.म्हणून मि त्यांना आजही सुसंकृत कुटुंब म्हणून मानते. देशाचे गृहमंत्री अमित शहा येथे आल्यानंतर, महाराष्ट्रात सर्वत्र वाढलेली गुन्हेगारी, कांदा निर्यात प्रश्न, विधानभवनात मारामाऱ्या, वाढती महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार मुक्त भारत,शेतीमालाला भाव या विषयावर त्यांच्या तोंडून काहीच ऐकू आले नाही त्यामुळे शहा जी आपसे ये उम्मीद नही थी असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. माझी भारतीय जनता पार्टी बरोबर विचारांची लढाई आहे, मतभेद आहेत, वैयक्तिक लढाई नाही.असेही सुळे म्हणाल्या.

दौंड दौऱ्यावेळी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये त्या बोलत होत्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे पदाधिकारी आप्पासाहेब पवार, रामभाऊ टूले, सचिन काळभोर गायकवाड उपस्थित होते. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, भाजपाकडून सर्वत्र दमदाटीचे राजकारण केले जात आहे. याला कुठेतरी चाप बसायला हवा. नाहीतर उद्या हे लोकांच्या घरात घुसतील आणि आम्ही हे सहन करणार नाही त्यासाठी मा. शरद पवार यांनी पुढाकार घेतला आहे, कोणीतरी कैवारी पाहिजेच. अनेक महिने मी बोलत आहे की, ईडी चा गैरवापर होतो आहे, दबावाचे राजकारण करून दहशत केली जात आहे. संजय राऊत, नवाब मलिक, अनिल देशमुख, डी.के. शिवकुमार यांनी सगळ्यांनी मोठी लढाई दिली आहे. ते लढले आणि जिंकले सुद्धा. याउलट अशोक चव्हाण यांच्यावर लोकसभेमध्ये भाजपाने आरोप केले आणि तिसऱ्याच दिवशी त्यांचा पक्ष प्रवेश करून घेतला. त्यामुळे अशोक चव्हाण भ्रष्ट आहेत की नाही? याचे उत्तर माझ्याकडे नाही, याचे उत्तर भाजपाने दिले पाहिजे.भ्रष्टाचार म्हणजे काय आणि भ्रष्टाचार मुक्त म्हणजे नक्की काय. भ्रष्टाचार करा आणि मुक्ती हवी असेल तर भाजपा मध्ये येऊन करा असे सध्या चालू आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपले आयुष्य कसे जगायचे हे त्यांनीच ठरवायचे असते, लढायचे की शरण जायचे. मी स्वतः संघर्षाचा मार्ग ठरविलेला आहे आणि सत्ता व अदृश्य शक्ती एका बाजूला व दुसऱ्या बाजूला संघर्ष, वडील आणि विचार



असे माझे समीकरण आहे. शेतकरी बांधवांच्या प्रश्नाबद्दल बोलताना त्या म्हणाल्या की, शेतकरी बांधवांना मोफत वीज द्या दोन रुपये तरी कशाला घेता. शेतकरी अडचणीत आला आहे, सरसकट कर्जमाफी करावयास हवी.लोकशाहीमध्ये प्रत्येकाला निवडणूक लढविण्याचा अधिकार आहे. मायबाप जनता ठरविते त्याचे काय करायचे. संपूर्ण महाराष्ट्रात ट्रिपल इंजिनचे सरकार आल्यापासून दमदाटी सुरू आहे. इंदापूरला हर्षवर्धन पाटील यांना धमकी दिली जात आहे. सत्तेत असलेल्या लोकांची ही स्टाईल झाली आहे. जो सत्तेत आहे तोपर्यंत कोणालाही धमकी देत आहे, ही दडपशाही कोठेतरी थांबली पाहिजे कारण देशात लोकशाही आहे, दडपशाही सहन करणार नाही. इतकी वर्ष येथे सुसंस्कृत लोक राजकारणात होते, हा सर्व प्रकार अदृश्य शक्तीने सुरू केला आहे. तुम्ही गोडीत वागा.... आम्ही गोडीतच बोलणार, तुम्ही जर लोकांना भीती दाखवणार असाल तर त्यांचा कैवारी कोणीतरी व्हायलाच पाहिजे ना. त्यांनी धमक्या दिल्या आणि आम्ही गप्प बसलो असे कसे चालेल.मी राजकारण फायदा, तोटा यासाठी करीत नाही. माझ्यावर कै. यशवंतराव चव्हाण यांचे संस्कार आहेत म्हणूनच ८०% समाजकारण २०% राजकारण करते आहे. त्यामुळे फायद्यासाठी म्हणून मी कोणतेच काम करत नाही. तुमच्या आयुष्यात एक चांगला बदल घडविण्यासाठी मी लोकसभेत जाते. आणि म्हणूनच भारताच्या राष्ट्रपतींनी माझ्या कामाची नोंद घेतली आहे. त्यामुळेच बारामती मतदार संघातील मायबाप जनतेचे मी आभारी मानते की त्यांनी मला लोकसभेत पाठविले. लोकशाहीत सत्ताधारी आणि विरोधक दोघांचेही महत्त्व आहे. आम्ही अनेक वर्ष सत्तेत राहिलो आहोत, विरोधकही असला पाहिजे. तगडा विरोधक हा असलाच पाहिजे तरच लोकशाही टिकते. तुम्ही पक्ष, घर फोडणार.. लोकांना भीती दाखविणार यामधून काय निष्पन्न होणार आहे. यामध्ये भरडाला जात आहे तो फक्त सामान्य माणूस असे शेवटी सुप्रिया सुळे म्हणाल्या.

## खा.गोपचडे नी दिला जुन्या आठवणीना उजाळा

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर येथील वैद्यकीय महाविद्यालयात माझे MBBS शिक्षण झाले. राज्यसभा सदस्यपदी निवड झाल्यानंतर प्रथमच महाविद्यालयाला भेट दिली त्यावेळी मन गहिवरून गेले तसेच महाविद्यालयीन जीवनातील आठवणी जाग्या झाल्या. या महाविद्यालयात माझी वैद्यकीय क्षेत्रातील करियर घडण्याबरोबरच सामाजिक जाणीव घडविली गेली होती. या महाविद्यालयातील काही निवृत्त प्राचार्य व प्राध्यापकांचीही भेट झाली. वैद्यकीय क्षेत्रातील नवे विषय, संशोधन क्षेत्रासंदर्भात चर्चा करून , या क्षेत्रातील विविध समस्यांवर उपाययोजनांबाबत सरकारची भूमिका काय असावी या मुद्द्यांवर त्यांचे मार्गदर्शन लाभले. वैद्यकीय महाविद्यालयातील माझे सर्व गुरुजन, सहकारी मित्र यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.



## इनरव्हील क्लब सांगोला आदर्श शाळा अंगणवाडी येथे खेळणी व खुर्च्या भेट




**सांगोला । प्रतिनिधी**

इनरव्हील क्लब सांगोला यांच्या वतीने आदर्श शाळा अंगणवाडी येथे मुलांना खेळ खेळण्यासाठी बॅट बॉल व मोठे बॉल देण्यात आला हे साहित्य क्लब सदस्य सुरेखा सपाटे यांच्याकडून देण्यात आले त्याच अंगणवाडी शाळेमध्ये ऑफिससाठी तीन खुर्च्या देण्यात आल्या त्यासाठी माझी अध्यक्ष सौ मंगल चौगुले यांच्याकडून देण्यात आल्या या कार्यक्रमासाठी क्लबचे अध्यक्ष सौ सविता लाटणे माझी अध्यक्ष मंगल चौगुले सुरेखा सपाटे वर्षा देशपांडे प्रज्ञा चौगुले शाळेतील मॅडम व मुलं-मुली मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

## पंढरपुरात बेदाण्याला प्रतिकिलो ४०० रुपयांचा दर

पंढरपूर : बाजारात विक्रीसाठी आलेल्या नवीन बेदाण्याला मागणी वाढली आहे. त्यामुळे दरात चांगली वाढ झाली आहे. पंढरपूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बेदाणा सौदे बाजारात उच्चांकी ४०० रुपये प्रतिकिलो असा भाव मिळाला.उत्तम प्रतीच्या बेदाण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील बेदाण्याला राज्याच्या विविध भागातून मागणी वाढली आहे. मंगळवारी येथे झालेल्या बेदाणे सौदे बाजारात पाटकूल (ता. मोहोळ) येथील शेतकरी नितीन गावडे यांच्या बेदाण्याला उच्चांकी ४०० रुपये प्रतिकिलो असा भाव मिळाला आहे. हा दर बेदाणा सौदे बाजारातील आज पर्यंतचा सर्वाधिक दर मानला जात आहे.

## शेतकऱ्यांच्या हितासाठी पाणी आणि विजेचा प्रश्न सोडवण्यासाठी प्राधान्य देणार-आ.बाळासाहेब आजबे

**आष्टी । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांची खऱ्या अर्थाने प्रगती साधायचे असेल तर आपल्या भागामध्ये सिंचन क्षेत्र वाढणे गरजेचे आहे त्यासाठी या ठिकाणी पडणारा पाऊस याच ठिकाणी पावसाचे पाणी या ठिकाणी अडवले पाहिजे आपण सर्व आमदारांमध्ये सर्वात जास्त कोपबंधारे व सिनाब बंधारे मंजूर करून मतदारसंघांमध्ये सिंचन क्षेत्र वाढण्यासाठी प्रयत्न केला आहे शेतकऱ्यांच्या हितासाठी पाणी आणि वीज प्रश्न सोडवण्यासाठी आपण प्राधान्य देत असल्याचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी सांगितले आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आ.बाळासाहेब आजबे काका यांच्या हस्ते शिरूर तालुक्यातील मानूर, लोणी व वारणी येथे ०६ कोटी १० लक्ष रुपये किमतीच्या को.प बंधारा कामांचे उदघाटन व लोकार्पण करण्यात आले यावेळी जेष्ठ नेते दशरथ दादा वनवे तालुका अध्यक्ष विश्वास भाऊ नागरगोजे,नवनाथ ढाकणे धर्माभाऊ जायभाय



सभापती बाबुराव केदार ज्ञानदेव केदार अक्षय जाधव सतीश बडे,खेडकर इंजि,उदमले, अमित बडे, गोकुळ सव्वाशे, किशोर जेधे,कलिंदर पठाण, अनिल बडे, दिलीप बडे ,कालिदास खेडकर, भास्कर केदार ज्ञानदेव केदार, यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी बोलताना आमदार बाळासाहेब आजबे म्हणाले की आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यामध्ये कमी पाऊस पडत असल्याने या ठिकाणी सिंचन क्षेत्र वाढवण्यासाठी ठिकठिकाणी साठवण तलाव पाझर तलाव व त्याचबरोबर कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे होणे गरजेचे आहे त्यासाठी आपण शासनाकडे पाठपुरावा करून आतापर्यंत जवळपास १५० कोटी रुपये किमतीचे बंधारे मंजूर करून घेतले आहेत त्यामधील निम्म्यापेक्षा जास्त मंधारी पूर्ण झाले असून काही कामे प्रगती पत्र आहेत यामुळे त्या त्या भागातील सिंचन क्षेत्र वाढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मदत होणार आहे सिंचन क्षेत्र वाढले तरच शेतकरी सुखी आणि समाधानी होणार आहे त्यामुळे सिंचन पाणी आणि वीज ही शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात जर मिळाले तर शेतकऱ्यांना कुठेही जाण्याची वेळ येणार नाही या भागातील शेतकरी बागायतदार होईल म्हणून यापुढेही आपण शेती संबंधित सिंचन क्षेत्र कसे वाढवता येईल व त्यासाठी जोड व्यवसाय असे सुरू करता येतील यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले शिरूर तालुक्यातील महानोर लोणी व वारणी या ठिकाणी प्रत्येकी दोन को.प बंधाऱ्याचे भूमिपूजन व लोणी येथे सभा मंडपाचे भूमिपूजन आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी परिसरातील कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मला शरद पवार म्हणतात...हे विसरू नको सुनील शेळके यांच्यावर शरद पवारांचा निशाणा

## 'तू आमदार कोणामुळे झाला हे लक्षात ठेव'

**लोणावळा-तुझ्या अर्जावर माझी सही आहे, हे लक्षात ठेव. यापुढे असे केलेस तर मला शरद पवार म्हणतात... हे विसरू नको, मी त्या वाटेने जात नाही, मात्र गेलो तर कोणाला सोडत नाही, अशा शब्दात शरद पवार यांनी आमदार सुनील शेळके यांच्यावर टीका केली आहे. शरद पवार यांच्या सभेला पदाधिकारी आणि कार्यकर्ते येत असताना त्यांना सभेला जाऊ नका, अशी धमकी देण्यात आल्याची तक्रार शरद पवार यांच्याकडे करण्यात आली होती. यावरून शरद पवार यांनी आमदार सुनील शेळके यांना तू आमदार कोणामुळे झाला हे लक्षात ठेव, असे सुनावले आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी लोणावळा येथे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधला. या वेळी शरद पवार यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार टीका केली.**

लोकशाहीला संकटात नेणारा कारभार मोदी करत असल्याचा आरोप शरद पवार यांनी केला आहे. सामान्य माणसाचे अधिकार उध्वस्त होत आहेत, त्यामुळे लोकशाही आणि घटनेचे संरक्षण करण्याची आपली जबाबदारी असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या सत्तेचा गैरवापर करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना वारंवार समन्स पाठवण्यात येत आहे. त्यामुळे त्यांना अटक होण्याची शक्यता देखील शरद पवार यांनी व्यक्त केली आहे.मुंबईमध्ये मधील आदर्श सोसायटी घोटाळ्यामध्ये माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा हात असल्याचा आरोप भाजपने केला होता. त्यानंतर





भाजपने यासंबंधी उल्लेख केल्यानंतर त्याच्या सातव्या दिवशी अशोक चव्हाण हे भाजपमध्ये गेले. आणि लगेचच भाजपचे खासदार देखील झाले. भारतीय जनता पक्ष म्हणजे काय वॉशिंग मशीन आहे का? अशी जोरदार टीका त्यांनी केली. आरोप करा आणि त्यांना पक्षप्रवेश देऊन आरोप धुऊन टाका, अशा शब्दात शरद पवार यांनी भाजपवर निशाणा साधला. मोदींनी राज्य सहकारी बँक आणि जलसंपदा विभागात घोटाळा झाला असा आरोप केला होता. मात्र, हिम्मत असेल तर त्याची चौकशी करा, दूध का दूध आणि पाणी का पाणी होऊन द्या. त्यासंबंधी मोदींनी चौकशी करावी. मात्र, भाजप तसे करत नाही. आजपर्यंत भाजपने ज्यांच्यावर हात केले ते सर्व भाजपमध्ये असल्याची टीका शरद पवार यांनी केली आहे.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शरद पवार यांना पन्नास वर्षे महाराष्ट्राने सहन केले, अशी टीका केली होती. यावर शरद पवारांनी प्रत्युत्तर दिले आहे. मी अमित शहा यांचा आभारी आहे, कारण मला पन्नास वर्षे लोकांनी निवडून दिले, हे त्यांनी मान्य केले, असे म्हणत शरद पवार यांनी अमित शहा यांच्यावर पलटवार केला आहे. पहिल्यांदा आमदार नंतर खासदार नंतर मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, राज्यसभा हा सगळा कार्यकाळ पाहिला तर आता ५६ वर्ष झाली आहेत. देशाच्या संसदेत एक माणूस सतत ५६ वर्ष कुठे ना कुठे लोकांच्या कामात आहे, याचे कारण मला तुमची साथ असल्याचे म्हणत शरद पवार यांनी उपस्थित मतदारांचे आभार मानले.

# आमदार प्रणिती शिंदे यांच्याकडून मंगळवेढा तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी

**मंगळवेढा :** दुष्काळी परिस्थितीत मागील जनावराच्या छावणी चालकाची बिले दिली नाहीत.त्यामुळे छावण्या चालवण्याबाबत छावणी चालकाची मानसिकता होणार नाही.त्यामुळे यंदा छावण्या तरी कशा सुरू होणार ? या सरकारकडून जनावराचा आणि माणसाचा पोटचा घास हिसकावून स्वतःचे पोट आणि खिसे भरण्याचे काम सुरू असल्याचा आरोप आ.प्रणिती शिंदे यांनी केला.

काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पाहणीच्या निमित्ताने त्यांनी दक्षिण भागातील पाटकळ, खडकी, नंदेश्वर,भोसे,हुन्नूर, मानेवाडी, रड्डे सिद्धनकेरी, जालिहाळ, हाजापुर येथील ग्रामस्थांची संवाद साधला. या दौऱ्यात त्यांच्या समवेत धनश्री परिवाराचे शिवाजीराव काळुंगे, सुरेश कोळेकर, ॲड,नंदकुमार पवार,फिरोज मुलाणी,तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, शहराध्यक्ष मनोज माळी, युवक तालुकाध्यक्ष ॲड रविकरण कोळेकर अशोक चेळेकर विष्णुपंत शिंदे, पांडुरंग जावळे, मारुती वाकडे ,अजय अदाटे,सुलेमान तांबोळी, बापू अवघडे, नाथा ऐवळे, सुनीता अवघडे ,शाहीन शेख, जयश्री कौचाळे, शहाजी कांबळे संदीप पवार उपस्थित होते.आ.शिंदे म्हणाल्या की, या भागातील पाणी प्रश्नाच्या संदर्भातील विषय माझ्याकडे कार्यकर्त्यांनी आणल्यानंतर मी अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित केला. या भागातील पाण्याचा प्रश्न सुटेपर्यंत मी या भागातील जनतेसोबत राहणार असल्याचे सांगत दहा वर्षांपूर्वी माजी केंद्रीय मंत्री सुशील कुमार शिंदे यांनी मंजूर केलेल्या अनेक विकासकामातील पंढरपूर- विजयपूर हा रेल्वे मार्ग अद्याप मार्गी नसल्याचे सांगताना त्याबाबत सत्ताधाऱ्यांनी पाठपुरावा केला नाही म्हणून त्यांना



दर पाच वर्षाला नवीन उमेदवार द्यावा लागतोय.दुष्काळी निकषांमध्ये सोलापूर लोकसभा मतदारसंघातील तालुके वगळण्यात आणल्याने मोठा अन्याय सरकारने केला असून तालुक्यात खरोखर दुष्काळी परिस्थिती असताना निकष बदलून शेतकऱ्यांना सरसकट मदत मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार आहे. तरच तालुक्याला छावण्या पाण्याचे टँकर सुरू होऊ शकतील. दुष्काळी परिस्थितीमुळे दूध दर देखील कमी झाल्यामुळे दूध व्यवसाय देखील संकटात सापडला.त्यांना आधार देणे गरजेचे आहे.केंद्र व राज्यातील सत्ताधाऱ्यांच्या विरोधात सध्याच्या काळात जनमानसात तीव्र मानसिकता तयार होत असल्याचे आ. शिंदे म्हणाल्या. या दौऱ्यात त्यांच्याकडे नागरिकांनी तक्रारी केल्या त्या संदर्भातील काही तक्रारचे निरसन करण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांना मोबाईलवर वरून सूचना देखील दिल्या.भोसे येथे नागरिकांनी शिधापत्रिकावर धान्य मिळत नसल्याची तक्रार केल्यानंतर आ. शिंदे यांनी तहसीलदारांना यांना दूरध्वनीवरून या भागात दुष्काळी परिस्थिती असून पाणी नाही, तुम्ही रेशनचे धान्य देण्याचेही बंद करून कसं होईल ? असा सवाल उपस्थित केला

## बापूसाहेब झपके यांच्या परीस स्पर्शाने पावन झालेले आम्ही विद्यार्थी - विलास पाटील सर

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला,जुनी अकरावी शेवटच्या बॅचच्या वतीने ग्रुप सदस्य विलास पाटील सर यांचा वाढदिवस नुकताच मित्रमंडळीच्य वतीने साजरा करण्यात आला.विलास नलवडे गुरुजी यांच्या दुकानात सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी ग्रुप सदस्य आनंद ऊर्फ साईराम कांबळे, गुरुवर्य प्रा. तायप्पा आदट, दामोदर नागणे सर यांच्या हस्ते पाटील यांचा सत्कार करण्यात आला. प्रा.राजाभाऊ ठोंबरे यांनी पाटील सर व त्यांच्या बालपणापासून आतापर्यंतच्या मैत्रीचा व वाटचालीचा आढावा घेऊन पुढील आयुष्यासाठी पाटील यांना शुभेच्छा दिल्या.विश्वनाथ ऊर्फ खंडू कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले . सत्काराला उत्तर



देताना पाटील सर म्हणाले की गुरुवर्य कै.बापूसाहेब झपके यांच्या परीस स्पर्शाने पावन झालेला हा ग्रुप असून बापूसाहेबमुळे आमचे जीवन यशस्वी झाले आहे.बापूसाहेब झपके व मोहिते गुरुजींना आदरांजली वाहून सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.विलास नलवडे गुरुजी यांनी प्रास्ताविक केले.या कार्यक्रमास नागेश गुळमिरे,प्रभाकर व्हटे, पांडुरंग भुईटे, बाळासाहेब ताकभाते,अनिल चोथे आदि उपस्थित होते.

## कमलापूर येथील कार्तिक दूध संकलन केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांना घसघशीत अनुदान मिळाले

**सांगोला । प्रतिनिधी**

कमलापूर गावामध्ये जवळजवळ शेकडो शेतकऱ्यांना शासनाचे पाच रुपयाचे प्रतिलिटर मागे अनुदान खात्यावर थेट जमा झाले याचे पूर्ण श्रेय कमलापूर गावातील उदयमुख असलेले कार्तिक दूध व्यवसायामध्ये अग्रेसर असलेले कार्तिक दूध संकलनाचे सन्माननीय चेअरमन हनुमंत उर्फ (बंडू) भाऊ तंडे यांच्या अथक प्रयत्नातून दुष्काळाची अतिशय भयावह परिस्थिती असताना राज्य शासनाच्या जाचक अटी वेळेत दूर करून अनेक दुग्ध उत्पादकाची स्वतः खाती काढून सदचे पाच रुपयाची अनुदान त्यांच्या खात्यावर थेट जमा केले. सुद्धा कमलापूर गावातील शेतकऱ्याला फुल नाही फुलाची पाकळी म्हणून पाच रुपयाचे प्रतिलिटर मागे अनुदान खात्यात जमा झाल्याबद्दल



कमलापूर पंचक्रोशीत त्याबद्दल पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. यावेळी कमलापूर पंचक्रोशीतील सर्व शेतकऱ्यांनी चेअरमन हनुमंत उर्फ बंडू तंडे यांचा उत्साही वातावरणात महाराष्ट्रीयन मानाचा तुरेबाज फेटा म्हणून सत्कार करण्यात आला. तसेच डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी शेतकऱ्याच्या प्रति बंडूभाऊ यांनी जपलेली सामाजिक बांधिलकी ओळखून डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी त्यांचा सत्कार केला व भविष्यातील आपल्या दुग्ध व्यवसायाला तसेच राजकीय व आर्थिक जीवनासाठी शुभेच्छा रुपी आशीर्वाद दिले.

### लोकसभा निवडणुकीआधी मोठा निर्णय

# एलपीजी सिलिंडरवर ३०० रुपयांची सूट

मुंबई (वृत्तसंस्था)-आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त (८ मार्च) केंद्र सरकारने महिलांसाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पंतप्रधान उज्वला योजनेतील लाभार्थ्यांना मिळणारी ३०० रुपयांची प्रतीसिलिंडर सूट पुढील एक वर्षासाठी वाढविण्यात आली आहे. या अनुदानाची मुदत मार्च २०२४ पर्यंत होती, मात्र आता त्यात वाढ करून मार्च २०२५ अशी एक वर्षाची वाढ केली आहे. दहा कोटीहून अधिक कुटुंबांना याचा लाभ मिळले, असे कॅबिनेट मंत्री पियुष गोयल यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.



याशिवाय केंद्र सरकारचे कर्मचारीआणि पेन्शन धारकांच्या महागाई भत्त्यात ४ टक्क्यांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय जानेवारी २०२४ पासून पूर्व लक्ष्यीप्रभावाने लागू केला जाईल. ही वाढ केल्यामुळे आता ४६ टक्के असलेला महगाई भत्ता वाढून ५० टक्के झाला आहे.ऑक्टोबर २०२३ मध्ये शेवटची वाढ करण्यात आली होती. त्यावेळीही चार टक्क्यांची वाढ केल्यामुळे महागाई भत्ता ४६ टक्क्यांवर पोहोचला होता. कर्मचारी आणि पेन्शनधारक यांच्या महागाई भत्त्यात वाढ केल्यामुळे सरकारी तिजोरीवर एकत्रितपणे १२ हजार ८६८.७२ कोटींचा बोजा पडणार आहे. ४९.१८ लाख केंद्रीय कर्मचारी आणि ६७.९५ लाख पेन्शनधारकांना याचा लाभ मिळणार आहे. सातव्या वेतन आयोगाने केलेल्या शिफारशींनुसार ही वाढ करण्यात आली आहे.पंतप्रधान उज्वला योजना अंतर्गत आता मार्च २०२५ पर्यंत लाभार्थ्यांना प्रति सिलिंडर ३०० रुपयांची सूट दिली जाणार आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाचा लाभ १० कोटी कुटुंबाना होणार असल्याचे पियुष गोयल यांनी सांगितले. तर या निर्णयामुळे सरकारी तिजोरीवर १२ हजार कोटींचा भार पडणार आहे.

## मानवत शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करा

### भारतीय जनता पार्टीची मुख्याधिकारी यांच्याकडे मागणी

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत शहरात दिवसोन दिवस मोकाट जनावरांची संख्या वाढत असून त्यामूळे नागरीकांना अनेक संकटाचा सामना करावा लागत आहे. तर अनेक वेळा रहदारीचा प्रश्न निर्माण होत आहे. तर काल शहरात अज्ञात अवजड माल वाहूतक करणार्या ट्रकने गोमातेच्या अंगावर सरळ ट्रक घातल्याने गाय जागीच ठार झाली.

त्यामूळे शहरात हिंदू बांधवातून संताप व्यक्त केला जात आहे. मानवत नगर पालिकेच्या वेळ काढू व दूर्लक्षा मूळे मानवत नगर पालिकेच्या कार्यक्षेत्रा मध्ये मोकाट जनावरांची संखेत वाढली आहे. शहरात मोकाट जनावरे कोणाची आहेत याचा पण पत्ता मानवत नगर पालिका प्रशासनाला नसल्याने नागरीका मधून या विषयी चिंता व्यक्त केल्या जात आहे.

त्यामूळे मोकाट जनावर रोडवर फिरत आहे आणि त्यामुळे एका निष्पाप गौमातेचा अज्ञात वाहनाने जीव गेला तरी नगर पालिका प्रशासनाने लवकरात लवकर खबरदारीचा उपाय म्हणून गावातील सर्व मोकाट जनावरे आपल्या ताब्यात घ्यावीत आणि मानवत नगर परिषदेच्या शासकीय कोंडवाड्यामध्ये नेऊन कोंडावीत किंवा शहरातील गो शाळेत नेऊन सोडावीत भविष्यामध्ये मोकाट जनावर रोडला



दिसल्यास ते जप्त करण्यात येईल अशी ताकीद देऊन दंडात्मक कारवाई करावी अशा मागणीचे निवेदन भारतीय जनता पार्टीच्या वतीने आज मानवत नगर परिषदेचे कार्यालयीन अधिक्षक यांना देण्यात आले. या वेळी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे शहर उपाध्यक्ष रविभाऊ वाघमारे , भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष नागनाथ कुऱ्हाडे , भारतीय जनता पार्टीचे मानवत तालुका उपाध्यक्ष अमोलजी कुर्हाडे, गणेशजी शर्मा , दादासाहेब भोरकडे , ॲड, मुकुंदजी पाटील, अनिलजी घाटुळ आदींची या वेळी निवेदन देतांनी उपस्थिती होती.

## अधिस्विकृतीधारक पत्रकारांना रेल्वे प्रवासाची सवलत पुर्ववत सुरू करण्याची मागणी

### केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना भेटून बहुभाषिक साप्ताहिक संपादक, पत्रकार संघाचे निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

अधिस्विकृती पत्रिका धारक पत्रकारांना बंद करण्यात आलेली रेल्वे प्रवासाची सवलत पुन्हा सुरु करण्याची मागणी बहुभाषिक साप्ताहिक संपादक, पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना देण्यात आले आहे. ते बीड येथे बीड जिल्हयातील रेल्वे कामाच्या आढावा बैठकीसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आले होते. यावेळी त्यांची भेट घेवून सदरील निवेदन देण्यात आले. यावेळी बहुभाषिक साप्ताहिक संपादक, पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष शेख ताहेर, प्रदेशाउपाध्यक्ष सुनिल पोपळे, राज्य प्रसिध्दी प्रमुख शेख अब्दुल रहेमान, मराठवाडा उपाध्यक्ष नितेश उपाध्ये आदींची उपस्थिती होती.

भारतीय रेल्वे विभागाकडून पत्रकारांना रेल्वे



प्रवासात तिकिटामध्ये ५० टक्के सवलत दिली जात होती. देशभरातील राज्य शासनाने अधिस्विकृती पत्रिका दिलेले पत्रकार या योजनेसाठी पात्र होते. प्रवासात सवलत असल्या ने वार्ता संकलनासाठी, विविध राजकीय कार्यक्रमासाठी जाण्यासाठी सवलतीचा मोठा फायदा पत्रकारांना होत होता. राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजनांची प्रसिद्धी देण्यासाठी, विविध योजना लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी हे सोयीचे होते, असे निवेदनात म्हंटले आहे. सन २०२० पासून रेल्वे विभागाने पत्रकारांची ही सवलत बंद केली आहे. त्यामुळे देशभरातील पत्रकारांना अडचणी निर्माण झाल्या आहेत. प्रवासात सवलत नसल्याने अनेक पत्रकार प्रवास करत नाहीत परिणामी सरकारी योजना, शासकीय कार्यक्रमाला जाण्यास अडचणी येत आहेत. सर्व बाबींचा विचार करून देशभरातील राज्य शासनाने अधिस्विकृती पत्रिका दिलेल्या पत्रकारांना पूर्वीप्रमाणे रेल्वे प्रवासात सवलत देण्याची मागणी बहुभाषिक साप्ताहिक संपादक, पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे. या निवेदनावर संपादक विलास डोळसे, अविनाश वाघिरकर, प्रचंड सोळंके, लक्ष्मण गायकवाड, आदींच्या स्वाक्षर्या आहेत.

## जागतिक महिला दिनानिमित्त महिला शिक्षिकांचा गुणगौरव

**वडवणी । प्रतिनिधी**

संस्कार शिक्षण मंडळ,वडवणी संचलित प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलची स्थापना संस्थेचे संस्थापक,सचिव तथा मा.आ.केशवराव आंधळे यांनी ग्रामीण व डोंगरपट्ट्यातील लहान मुला-मुलींना इंग्रजीचे ज्ञान आत्मसात व्हावे या उद्देशाने सन २००९-१० मध्ये करुन पात्रता धारक महिला शिक्षिकेची नेमणूक केली कारण महिला स्वालंबी बनावे व स्वतःच्या आत दडलेल्या सर्जनशीलतेच्या माध्यमातून विद्यार्थी परिपूर्ण संस्कारीत व ज्ञानी बनवावेत म्हणून महिलांना आपले कर्तव्य करून दाखवण्याची संधी त्यांनी दिली.थेंबा थेंबा मधून येथे सामर्थ्याचा सागर व्हावा । विश्वाच्या कल्याणासाठी स्त्रीशक्तीचा जागर व्हावा । म्हणून ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमधील महिला स्टॉप अतिशय उत्साहाने प्रत्येक काम करतात त्या कार्यालयीन प्रभारी मार्गदर्शिका,श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम तसाच सौ. प्रियांका कुरकुटे मॅडम,इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या सौ.शीतल लाटणे मॅडम,विद्यार्थी प्रिय आदर्श शिक्षिका श्रीमती नितल लोकरे मॅडम,सौ.दिपाली फासे, श्रीमती सीमा शिंदे,सौ.मीरा चव्हाण,श्रीमती प्रणिता तांबडे,श्रीमती शिल्पा डोईफोडे,सौ.बनसोडे रुक्मिणी, सौ.सरस्वती केदार सेविका सौ.ज्योती आळणे हा नर्सरी ते फिफ्थ क्लास पर्यंत हा इंग्लिश स्कूलचा स्टाफ परिश्रम घेऊन उत्साहाने काम करतात अध्यापनाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विविध सांस्कृतिक उपक्रम तसेच विज्ञान प्रदर्शन नुकत्याच संपन्न झालेले मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा या अभियानामध्ये या इंग्लिश स्कूलने सक्रिय सहभाग नोंदवला होता महिला कर्मचाऱ्यांनी खूप परिश्रम या उपक्रमासाठी घेतल्याबद्दल मूल्यमापन समितीने विशेष महिला स्टाफचे अभिनंदन केले होते इंग्लिश स्कूलमधील युकेजीच्या वर्गशिक्षिका श्रीमती नितल लोकरे मॅडम जागतिक दिनानिमित्त आपले मत व्यक्त करताना त्या म्हणतात की, आईच्या आभाळभर शुभेच्छा बहिणीच्या निरागस छान शुभेच्छा मैत्रिणीच्या मनातल्या विश्वासाला शुभेच्छा प्रवासाला शुभेच्छा आजीच्या डोळ्यातील पाण्याला शुभेच्छा जगातील प्रत्येक नारीला शुभेच्छा आंतरराष्ट्रीय महिला दिन याला जागतिक महिला दिन असे म्हणतात ८ मार्च रोजी जगभरात हा दिवस साजरा केला जातो मी नितल लोकरे प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल या शाळेमध्ये २०१५ पासून शिक्षिका म्हणून अध्यापनाचे कार्य करत आहे मला या इंग्लिश स्कूलने सर्वात महत्त्वाचे शिकवले की,मला घरातून आणि मुलातून स्वतःसाठी वेळ काढायला शिकवले स्वतःसाठी जगायला शिकवले आणि त्याचबरोबर मला या इंग्लिश स्कूलने मला प्रिय असणारे विद्यार्थी व खूप साऱ्या मैत्रिणी दिल्या तशाच माझ्या प्रेरणादायी मार्गदर्शिका असणाऱ्या आंधळे मॅडम यांनी मला खूप मोलाचा मार्गदर्शन करून एक स्त्री मनात आणलं तर काहीही करू शकते हे सांगितले आणि त्यांनी मला वेळोवेळी योग्य मार्गदर्शन केले आणि कुठे चुकले तर मोठ्या बहिणीसारखे कान ही पकडले परंतु खरंच मला माझ्या इंग्लिश स्कूलने खूप काही शिकवले मला सगळ्या महिलांना असे सांगायचे आहे की प्रत्येक स्त्रीने आपल्यातील गुणांना ओळखले पाहिजे व ते प्रत्यक्षात आणले पाहिजे आणि प्रत्येक स्त्रीने स्वतःसाठी जगायला शिकले पाहिजे एवढीच जागतिक महिला दिनानिमित्त अपेक्षा आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. जागतिक महिला दिनानिमित्त प्रत्येक नारीला,तिच्या कर्तुत्वाला,तिच्या नेतृत्वाला,तिच्या सहनशक्तीला,तिच्या त्यागाला, तिच्या प्रेमाला सलाम करण्याचा आजचा दिवस म्हणून ०८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल मधील सर्व महिला कर्मचारी स्टाफला दैनिक प्रभावती नगरी परिवाराच्या वतीने त्यांच्या कर्तुत्वाला सलाम.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .